महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११८ वे | दिनांक : २३/०४/२०२६ | वार गुरूवार

## गडचिरोलीपासून कोकणापर्यंत उद्योगांचे जाळे : विशाल, अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन



**मुंबई** : राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी तब्बल ₹२,५६,१३७.०१ कोटींच्या १८ विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे सुमारे १ लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १४ वी बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू तसेच विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह उपस्थित होते.

या बैठकीमध्ये थ्रस्ट सेक्टर तथा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉड्युल, इन्गॉट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बैटरी, इलेक्ट्रीक वाहन निर्मिती/साहित्य, स्टील व गॅस टू केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या १८ प्रस्तावांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली.

•नाशिकमधील व्हर्च्युओसो कॉम्प्रेसर्स प्रा. लि. ८०० कोटींची गुंतवणूक करून ५०० जणांना रोजगार देणार आहे. अमरावती येथे टेंबो डिफेन्स प्रोडक्ट प्रा. लि.१,००० कोटीं गुंतवणूक करत आहे.

•तर छत्रपती संभाजीनगरमधील नायडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. १,००० कोटींची गुंतवणूक करून १००० नवीन रोजगार निर्माण करेल.

•पुण्याच्या शिरूर भागात जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. १५०० कोटींच्या गुंतवणुकीतून ३००० लोकांना संधी देणार आहे.

•गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात हरिओम पाईप इंडस्ट्रीज लि. ३,१३५ कोटींची गुंतवणूक करून ८००० जणांना रोजगार देणार आहे.

•अहिल्यानगरमध्ये निबे स्पेस ४,००० कोटींच्या गुंतवणुकीसह १००० रोजगार निर्माण करेल.

•पुण्याच्या तळेगाव भागात युरोबस इंडिया प्रा. लि. ४,२०० कोटींची गुंतवणूक आणि १२,००० रोजगार निर्मिती करेल.

•चंद्रपूरमध्ये मिलीयन स्टील प्रा. लि. २५६.०१ कोटींच्या गुंतवणुकीतून ३६० रोजगार देणार आहे.

•भंडारा जिल्ह्यात अशोक लेलँड लि. १०,००० कोटींची मोठी गुंतवणूक करून १००० रोजगार उपलब्ध करेल.

•नागपूरच्या बुटीबोरी येथे अंकमे क्लीनटेक सोल्युशन प्रा.लि. ११,४०० कोटींची गुंतवणूक आणि ७००० रोजगार निर्माण करेल. तर याच कंपनीचा रायगड/पालघरमधील ग्रीन स्टील प्रकल्प ११,००० कोटींची गुंतवणूक आणि २५०० रोजगार देईल.

•नागपूरमधील सोलार डिफेन्स अँड एरोस्पेस लि. १२,७८० कोटींच्या गुंतवणुकीतून ६८२५ जणांना काम देणार आहे.

•ग्लोब फोर्ज लिमिटेड, अहिल्यानगर आणि धाराशिवमध्ये १५,४३० कोटींची गुंतवणूक करून ३६०० रोजगार निर्माण करेल.

•रायगड येथे बालासोर अलॉयज १७,४७९ कोटींची गुंतवणूक आणि ३२०० रोजगार देणार आहे.

•छत्रपती संभाजीनगरमध्ये गोदावरी न्यु एनर्जी प्रा. लि. २७,५१५ कोटींची गुंतवणूक करून ४००० रोजगार निर्माण करेल.

•रायगड/पालघरमध्ये अॅकमे क्लीनटेक प्रा.लि.चा ग्रीन अमोनिया प्रकल्प ३७,८०० कोटींची गुंतवणूक आणि ४५०० रोजगार घेऊन येत आहे.

•गडचिरोलीत रश्मी मेटलर्जिकल इंडस्ट्री प्रा. लि. ४०,००० कोटींची भव्य गुंतवणूक आणि २०,००० रोजगार निर्माण करेल.

•सर्वात मोठी गुंतवणूक एस्सार एक्सप्लोरेशन अँड प्रोडक्शन लि. कडून रायगडमध्ये ५६,८५२ कोटींच्या रूपात होणार असून, त्यातून २५,००० जणांना रोजगार मिळणार आहे.

या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. तसेच तांत्रिक नवकल्पना, संशोधन-विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही याचा लाभ होणार आहे. याशिवाय, स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण व कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होणार आहे.

## प्रीतम मुंडेंचे राजकीय पुनरागमन; पक्षांतर्गतची मोठी जबाबदारी



**मुंबई** : भाजपने माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांना पुन्हा सक्रिय राजकारणात आणत त्यांना महत्त्वाची संघटनात्मक जबाबदारी दिली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पश्चिम विभाग प्रभारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे त्यांच्या राजकीय पुनर्वसनाची चर्चा सुरू झाली आहे. गेल्या काही काळापासून त्या राजकारणात कमी सक्रिय दिसत होत्या, मात्र आता पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना पुन्हा मैदानात उतरवले आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बीड मतदारसंघातून प्रीतम मुंडे यांच्या ऐवजी पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्या निर्णयानंतर प्रीतम मुंडे यांची राजकीय हालचाल कमी झाल्याचे चित्र होते. स्थानिक निवडणुकांमध्येही त्यांचा सहभाग मर्यादित दिसत होता. त्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत प्रश्न उपस्थित होत होते. मात्र, आता भाजपने त्यांना संघटनात्मक जबाबदारी देत पुन्हा संधी दिली आहे.

पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी भाजपने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी प्रभारी नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या माध्यमातून पक्षाची धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि सरकारच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत नेणे हा उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर प्रीतम मुंडे यांच्याकडे छत्रपती संभाजीनगरच्या पश्चिम भागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे त्या आगामी काळात अधिक सक्रिय भूमिका बजावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, भाजपमध्ये जिल्हा प्रभारी नियुक्त्यांमध्ये मोठे फेरबदलही करण्यात आले आहेत. भंडारा जिल्ह्यात दोन दिवसांतच प्रभारी बदलल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरुवातीला बंटी भांगडिया यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, अल्पावधीतच त्यांच्याकडून जबाबदारी काढून घेण्यात आली आणि त्यांना गडचिरोली जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली.

भंडाऱ्याची जबाबदारी नंतर वर्ध्याचे माजी खासदार रामदास तडस यांच्याकडे सोपवण्यात आली. या बदलामागे स्थानिक राजकीय समीकरणांचा विचार करण्यात आल्याची चर्चा आहे. भंडाऱ्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या भूमिकेबाबतही विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असला, तरी पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने हे बदल केल्याचे सांगितले जात आहे.

## करुणा शर्मांनी पतीराजला विचारून फॉर्म भरला : बारामती पोटनिवडणुकीवरून बजरंग सोनवणेंनी धनंजय मुंडेंना डिवचले



**बीड** : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान पार पडणार आहे. या मतदानापूर्वी महायुतीने बारामतीत जोरदार शक्तीप्रदर्शन करत जाहीर सभा घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सभेला संबोधित करताना, महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन बारामतीकरांना केले. तसेच, विरोधातील उमेदवारांवर टीका करताना फडणवीस म्हणाले की, काहींनी केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापोटी या निवडणुकीत आपले अर्ज दाखल केले आहेत.

या सभेला महायुतीचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांची उपस्थिती विशेष चर्चेचा विषय ठरली. कारण, या पोटनिवडणुकीत धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा शर्मा यांनीही अपक्ष उमेदवारी अर्ज भरला असून, त्या निवडणुकीच्या मैदानात आहेत. याच मुद्द्यावरून खासदार बजरंग सोनवणे यांनी धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत खोचक टोला लगावला. घरच्याच व्यक्तीने विरोधात उमेदवारी अर्ज भरल्याचा संदर्भ देत सोनवणे यांनी मुंडेंना डिवचले आहे.

बजरंग सोनवणे म्हणाले, बाहेरचे हवशे, गवशे, नवशे तिथे गेले असून आमच्या बीडच्या ताई देखील तिथे जाऊन निवडणुकीत उभारल्या आहेत. माझ्या पतीराजाला विचारून मी फॉर्म भरला, असे करुणा शर्मा (मुंडे) यांनी म्हटले होते. हा प्रकार नेमका काय? ही भानगड काय? हेच कळत नसल्याचे सोनवणे यांनी म्हटले आहे. तसेच प्रत्येक पक्षाने सुनेत्रा पवार यांना बिनशर्त पाठिंबा दिला पण निवडणूक ही कोणाची खोडी हे सुद्धा कळायला पाहिजे, असे म्हणत त्यांनी धनंजय मुंडे यांचे नाव न घेत डिवचले आहे.

दरम्यान, अजित पवारांच्या अपघात प्रकरणी बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले, ब्लॅक बॉक्स कुठे आहे? तपास कोणत्या दिशेने ऑफिशियली आणि अनऑफिशियली देखील माहीत नाही. महाराष्ट्राची इच्छा आहे, या गोष्टीचा तपास लागला पाहिजे आणि सत्य महाराष्ट्रासमोर आले पाहिजे. मुख्यमंत्र्यांकडून प्रत्येक सभेत या घटनेचा तपास सुरू आहे, असे सांगितले जाते. त्याबाबत मुख्यमंत्र्यांचे कौतुक, ते एखादी गोष्ट करायची असे म्हणतात पण कधी करणार तो दिवस कधी येणार याबाबत माहीत नाही, असे म्हणत सोनवणे यांनी टोला लगावला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ एप्रिल २०२६


## राष्ट्रीय लोकमोर्चा पार्टी छत्रपती संभाजीनगरच्या शहर अध्यक्षपदी सचिन वाघमारे यांची नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टी ची छ. संभाजीनगर येथे कार्यकर्ता बैठक बाबासाहेब पठारे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. आदरणीय नेते राज्यसभा खासदार उपेंद्र कुशवाह साहेब राष्ट्रीय अध्यक्ष तसेच आदरणीय अरविंद वाजपेयी साहेब वरिष्ठ उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ता आणि पृथ्वीराज यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा प्रचार व प्रसार महाराष्ट्रामध्ये होण्याच्या उद्देशाने विचार विनिमय करण्या संदर्भात प्रमुख कार्यकर्त्यां च्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकी ला महाराष्ट्र प्रदेश महासचिव अँड. अमोल वाकेकर, मराठवाडा उपाध्यक्ष पाशुभाई शेख मार्गदर्शनाखाली सचिन वाघमारे यांची छत्रपती संभाजीनगर शहर अध्यक्ष म्हणून निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले.

या बैठकीस जेष्ठ नेते प्रभू बनकर, अजय धीवर सतीश बनकर, शैलेश वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## पुण्याच्या विजेता मीडियाचा राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र रत्न पुरस्कार जिंतूरच्या प्रदीप कोकडवार यांना जाहीर



**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** १ मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पुण्याच्या विजेता मीडिया च्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श महाराष्ट्र रत्न पुरस्कार जिंतूर येथील सामाजिक कार्यकर्ते प्रदीप सोपानराव कोकडवार यांना सामाजिक सेवा या क्षेत्रातून जाहीर झाला आहे. रविवारी ता १० मे रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सदरील पुरस्कार पुणे येथे दिला जाणार आहे. प्रदीप कोकडवार हे जिंतूरचे रहिवाशी असून सध्या ते महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य संघटक प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. श्री कोकडवार यांनी विश्व हिंदू परिषद चे जिंतूर प्रखंड प्रमुख म्हणून १९९० ला जबाबदारी सांभाळली. १९९१ व १९९२ ला आयोध्या श्रीराम जन्मभूमी आंदोलनात कारसेवा करण्याचा सुवर्ण योग त्यांना आला. १९९५ ते २००१ भाजपा युवा मोर्चा ता अध्यक्ष, २००१ ते २००६ जिंतूर नगर परिषद नगरसेवक, २००७ ते २०१६ पूर्ण वेळ पत्रकार, परभणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद अशासकीय सदस्य २०१८ते २०२१, जिंतूर ता व्यापारी महासंघ उपाध्यक्ष २०१९ पासून तर २०१७ पासून महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा या राज्यस्तरीय सामाजिक संस्थेत राज्य प्रसिद्धी प्रमुख म्हणून तीन वर्ष सेवा, तर २०२० ते आज पर्यंत राज्य संघटन प्रमुख ही जबाबदारी सांभाळत आहेत. राज्य संघटन प्रमुख जबाबदारी दरम्यान राज्यातील विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात जिल्हा कार्यकारिणी निवड प्रक्रिया साठी त्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. शिर्डी, तिरुपती, पंढरपूर व आयोध्या येथे झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनातील आयोजन व नियोजनात प्रत्यक्ष सहभाग घेऊन त्यांनी अधिवेशन यशस्वी केले. श्री कोकडवार यांनी राज्याचे माजी मंत्री सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या जन्मदिनी दरवर्षी राज्यभर वृक्षरोपण कार्यक्रम तसेच महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार दत्तात्रय गादेवार यांच्या जन्मदिनाच्या निमित्त राज्य स्तरावर सलग ३ वर्ष राज्यभर रक्तदान शिबिराचे आयोजन व नियोजन करून सहभाग नोंदवला. सध्या महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा या संस्थेचे श्री क्षेत्र तिरुपती येथे १०२ रूम चे सर्व सोयीने युक्त अद्यावत असे भव्य भक्त निवास उभारण्याचा ड्रीम प्रोजेक्त चे काम सद्या सुरु झाले आहे. देणगीदरांच्या सहकार्याने हा प्रोजेक्त लवकरच करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे यात सेवा करण्याची संधी श्री कोकडवार यांना मिळाली आहे. रविवारी ता १० मे ला दुपारी १२ वाजता नवी पेठ पुणे येथील निवारा वृद्धाश्रम हॉल मध्ये पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. प्रदीप कोकडवार यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी व जिंतूर च्या मित्र परिवार व हीतचिंतकांनी अभिनंदन केले आहे.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## साखरे बोरगांव येथे राजेसाहेब दर्गा उरूस निमित्त भव्य कुस्ती स्पर्धा संपन्न



**पाटोदा (प्रतिनिधी) :** :बीड तालुक्यातील मौजे साखरे बोरगांव येथे अक्षय तृतीया निमित्त राजेसाहेब दर्गा उरुस यात्रे निमित्त बालाघाट हिंद केसरी जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.या वर्षी बालाघाट हिंद केसरीचा बहुमान आहेर चिंचोली चा पैलवान आकाश करे यांनी पटकवला आहे. स्वर्गीय रावसाहेब टेकाडे यांच्या स्मरणार्थ ११११११ रुपयाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस व बालाघाट हींद केसरी चे सन्मानचिन्ह देवून आकाश करे यांचा सन्मान करण्यात आला. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेत राजेसाहेब दर्गा उरुस भव्य संदल मिरवणुक काढण्यात आली. कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीचा खेळ आजही साखरे बोरगांव येथे ही कुस्ती पंरपंरा कायम ठेवली आहे. या स्पर्धेत कै. हरिश्चंद्र घोडके यांच्या स्मरणार्थ ५५५५,रुपयाचे बक्षिस, कै. रामकृष्ण घरत यांच्या स्मरणार्थ ३३३३ रुपयाचे बक्षीस, कै. शांताबाई घरत यांच्या स्मरणार्थ २२२२रुपायाचे बक्षीस, कै. सोमनाथ देवगुडे यांच्या स्मरणार्थ ११११ रुपयाचे बक्षीस ,माजी सरपंच कै.गंगाधर जगदाळे यांच्या स्मरणार्थ ११११रुपयाचे बक्षीस, कै. बाबासाहेब घरत यांच्या स्मरणार्थ ११११रु.बक्षीस व कै.प्रभाकर झनझन यांच्या स्मरणार्थ ११११ रुपायाचे रोख बक्षीस ठेवण्यात आले होते. प्रारंभी कुस्ती स्पर्धेचे उदघाटन नामवंत पहेलवान मा.श्री. बाळासाहेब आवारे(आबा) व पैलवान शंकर अप्पा चव्हाण यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. या कुस्ती स्पर्धेत महिला कुस्तीपटुने सहभाग नोंदवला. वाशी येथील दोन विद्यार्थीने योगाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके दाखवली. बालाघाट केसरीचा बहुमान मुबंई महानगरपालीकेचे नगररचना अभियंता विजय टेकाडे, मच्छिंद्र घरत, माजी सरपंच नामदेवराव देवगुडे, सरपंच गजानन घरत चेअरमन राजेंद्रनाना घरत, माजी सरपंच बाबासाहेब देवगुडे, गुत्तेदार राजेंद्र घोडके,आदि मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या कुस्ती स्पर्धेत पंच म्हणुन अशोक गाढवे, विश्वाबंर जगदाळे, रमेश देवगुडे आदिनी काम पाहिले तर या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीचे सदस्य ईंजि. शिवाजी घरत, बालासाहेब घोडके, ह.भ.प.वसंत जगदाळे, सुरेश घोडके प्रा.डॉ. अशोक देवगुडे, दत्ता जगदाळे,अजिंक्य जगदाळे, अविनाश जगदाळे, संभाजी जोगदंड , बापू जाधव आदि तरूण मंडळीने अथक परिश्रम घेतले.या कुस्ती स्पर्धेचे बहारदार संचलन व समालोचन रामहारी घोडके यांनी केले तर, आभार राजेंद्र नाना घरत यांनी मानले.

## सांज सोनेरी किरणे

सांज सोनेरी किरणे
रानोमाळ पसरली
काळ्या रानाची अंघोळ
अशी उन्हामध्ये झाली

गाय-वासरांना ओढ
कशी गोठ्याची लागली
रानावनात राबून
माय घराला चालली

क्षितिजाच्या कडेवर
सूर्यबिंब विसावले
सप्तरंगांच्या छटांनी
निळे आभाळ सजले

डोंगरांच्या कुशीमध्ये
लेकी सावल्या निजल्या
अवखळ वाऱ्यासंगे
बोरी-बाभळी हसल्या

असा थकला दिवस
आली रात्र सोबतीला
नव्या पहाटेचं स्वप्न
पुन्हा पडलं रातीला

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ एप्रिल २०२६


## माझ्या अंगणात

माझ्या अंगणात
येरे येरे मोरा
आवडतो तुझा
लांब लांब तुरा

माझ्या अंगणात
येरे येरे मोती
ईमानदारीचे गुण
गावे तरी किती

माझ्या अंगणात
येगं येगं चिऊताई
घरटे बांधण्याची
सदा असते घाई

माझ्या अंगणात
येरे येरे काऊ
तुला देतो मी
गोड गोड खाऊ

माझ्या अंगणात
येगं येगं कोकिळा
कान तृप्त होई
ऐकून तुझा गळा



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## प्रभा आनंदाची आली

भीमराया तुझ्यामुळे,
जगण्याचे मिळे हमी.
हक्क अधिकार दिले,
नाही कशाचीच कमी. १

शिक्षणाचा मूलमंत्र,
पटवून दिले बाबा.
मिळवून दिले तुम्ही,
हक्क अधिकार ताबा. २

शिक्षणाची क्रांती होता,
ज्ञानगंगा सुरू झाली.
गुलामांच्या जीवनात,
प्रभा आनंदाची आली. ३

चौदा एप्रिलला जग,
भीम जयंतीत दंग.
सारे वाचुनी पुस्तक,
भरतात निळे रंग. ४

अशी कशी तुझी छाया,
आम्हावर तू दाविली.
संविधान लिहितांना,
माया आम्हाला लाविली. ५

तुझ्या कष्टामुळे आज,
सुख आले आम्हा दारी.
आनंदात जगतांना,
उपकार तुझे भारी. ६

भीमराया तुझ्यामुळे,
सारे गळाले बंधन,
हात जोडूनी करतो,
भीमा तुला मी वंदन. ७

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर***

# ज्ञानेश्वर विद्यालयात शासन स्तरावरील पट पडताळणी संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालय येथे मंगळवारी, २१ एप्रिल २०२६ रोजी शासन स्तरावरील पट पडताळणी प्रक्रिया उत्साहात पार पडली. माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीम. अश्विनी लाटकर आणि डॉ. सुनील आदिक यांच्या पथकाने शाळेला भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.शालेय कामकाजाचा आढावा आणि सुसंवादया भेटीदरम्यान शिक्षणाधिकारी लाटकर यांनी शाळेच्या दैनंदिन कामकाजाची सखोल माहिती घेतली. केवळ कागदोपत्री तपासणी न करता, त्यांनी प्रत्यक्ष वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल त्यांनी काही प्रश्न विचारले, ज्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे उत्तरे दिली.सॅनिटरी पॅड डिस्पॉसल मशीनचे उद्घाटन आणि वृक्षवाटिका पाहणीयाच प्रसंगी विद्यालयात सॅनिटरी पॅड डिस्पॉसल मशीनचा प्रतिनिधिक स्वरूपात उद्घाटन सोहळा पार पडला. पट पडताळणीच्या निमित्ताने आलेल्या मान्यवरांच्या हस्ते हे उद्घाटन झाल्याने एक प्रकारे दुग्धशर्करा योग जुळून आला. यासोबतच मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सहभागातून विकसित केलेल्या 'कै. पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ वृक्षवाटिकेची' पाहणी केली. अत्यंत देखण्या स्वरूपात जोपासलेल्या या बगीच्याची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची त्यांनी मनभरून प्रशंसा केली.उपस्थिती आणि गुणवत्तेवर समाधानपट पडताळणी अंती, शाळेतील विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा पाहून पथकाने समाधान व्यक्त केले. "विद्यार्थ्यांची शैक्षणिक ओढ आणि शाळेचे शिस्तबद्ध नियोजन कौतुकास्पद आहे," अशा शब्दांत श्रीम. अश्विनी लाटकर यांनी शाळेचे गौरव केला.

मुख्याध्यापिकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजनया संपूर्ण प्रक्रियेवेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीम. डॉ. संध्या मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी पथकाला शालेय उपक्रम आणि राबवल्या जाणाऱ्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक पद्धतींची माहिती दिली.या यशस्वी तपासणीबद्दल शाळेतील शिक्षक वृंद आणि पालकांनी आनंद व्यक्त केला असून, प्रशासनाच्या वतीने शाळेच्या पारदर्शक कारभाराचे स्वागत होत आहे.






# प्रसाद ममाळे याची करिअर कट्टा धाराशिव जिल्हा समन्वयक व छत्रपती संभाजीनगर विभागीय प्रतिनिधी म्हणून निवड



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायत्ता केंद्र आयोजित करिअर कट्टा अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी संशोधन नियोजन समितीच्या धाराशिव जिल्हा समन्वयक व छत्रपती संभाजीनगर विभागाचा विभागीय प्रतिनिधी म्हणून श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा प्रसाद मम्माळे या विद्यार्थ्यांची निवड करिअर कट्ट्या अंतर्गत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील करियर कट्टा नियोजन समिती च्या मतदानाद्वारे ही निवड करण्यात आली आहे. महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आणि त्यांच्या करिअरला दिशा देण्यासाठी यशस्वीरित्या राबवला जातो. या करीअर कट्ट्यांतर्गत कु.आणिशा सुरवसे हीची दिल्ली दौऱ्यासाठी निवड झाली होती तर गणेश मोरे हा सध्या टेक्निकल इंटर प्रमुख म्हणून राज्य पातळीवर काम करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुढील शैक्षणिक वर्षासाठी श्री. प्रसाद मम्माळे याची निवड करण्यात आलेली आहे. तो यावर्षी बी.ए.द्वितीय वर्षात शिकत असून करिअर कट्ट्याअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या प्रत्येक उपक्रमांमध्ये त्याचा सहभाग असतो. त्याच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी सत्कार करून त्यास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन करिअर कट्टा हा उपक्रम इतर महाविद्यालयांमध्येही प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

याप्रसंगी महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. चंद्रसेन करे, प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले व करिअर कट्ट्यातील विद्यार्थी कु. दिशा सुरवसे, कु. योगेश्वरी मारकड, इनामदार सैफ, सुशील सूर्यवंशी, गणेश मोरे, कु.पूजा हांडे आणि प्रियंका इंगळे उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ एप्रिल २०२६


# नक्षलवाद संपला, विचार संपेल काय ?

**३१** मार्च २०२६ पर्यंत देशातील नक्षलवाद संपविण्याचे लक्ष केंद्राने ठेवले होते. त्यामध्ये त्यांना बऱ्यापैकी यश प्राप्त झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्याचा विचार करायचा झाल्यास पोलीस विभागाच्या आकडेवारीनुसार जिल्यात सद्या सहा नक्षलवादी अस्तित्वात असल्याचा अहवाल आहे. एकेकाळी देशातील सहा-सात राज्यामध्ये अस्तित्वात असलेला नक्षलवाद मागील दोन दशकापर्यंत देशातील केवळ आठ ते दहा जिल्ह्यांमध्ये तग धरून होता. केंद्राने नक्षल चळवळीचा बिमोड करण्याचे धोरण अवलंबिले. मागील दोन वर्षापासून नक्षलविरुध्द आरंभलेल्या धडक मोहिमेमुळे देशातील नक्षल्यानी एकतर मोठ्या प्रमाणात शरणागती पत्करली किवा त्यातील बहुतेकांचे बळी गेले. वर्तमानात गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल्यांचे ग्रहण सुटले मात्र जिल्ह्याचे प्रश्न सुटले काय? यासंदर्भात घेतलेला हा आढावा.नक्षल चळवळीचा उदय स्वातंत्र्यानंतर देशाने जमीन सुधारणा धोरण अवलंबिले खरे मात्र त्याचा फारसा फायदा शेतकऱ्यांना झाला नाही. मोठ्या जमिनदारांकडे असलेली जमीन भूमिहीनांना मिळेल हा आशावाद धुळीस मिळाला. जमीनदारांकडून शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण होऊ लागले. यातून जमीनदार आणि शेतकरी, शेतमजूर यांच्यात संघर्ष वाढीस लागला. शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. पश्चिम बंगालमध्ये असा असंतोष अधिक वाढीस लागला. शेतकऱ्यांच्या या असंतोषाला चारू मजुमदार, कानू सन्याल, जंगल संथाळ सारख्या डाव्या विचारसरणीच्या नेत्यांनी वाचा फोडली. जमीनदारांचा बिमोड करण्याकरिता हिंसक आंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी दाखवून दिले. यातूनच 1967 मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारीमध्ये सशस्त्र आंदोलन उभं राहिलं आणि त्यामध्ये अनेक जमीनदारांचा जीव गेला. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारातही अनेक शेतकरी, आदिवासींचा जीव गेला. ही घटना तिथल्या विद्रोहाला चालना देणारी ठरली. बंदुकीतून पर्यायाने हिंसेतून मार्ग सुटू शकतो, शोषण थांबू शकते असा विश्वास लोकांमध्ये बळावत गेला. पुढे या चळवळीला सर्वसामान्यांचे समर्थन वाढत गेले आणि पश्चिम बंगालच्या बाहेर अन्य राज्यातही या चळवळीने हातपाय पसरण्यास सुरुवात केली. सत्तर-अंशीच्या दशकात या चळवळीने गडचिरोली जिल्यात प्रवेश केला. जिल्यातील जमीनदारी, आदिवासींचे शासन-प्रशासनाकडून होणारे शोषण हा मुख्य मुद्दा घेऊन या संघटनेने जिल्ह्यात काम करण्यास सुरुवात केली.आदिवासींचे तारणहार गडचिरोली जिल्यातील आदिवासी समुदाय हा निरक्षर आणि अज्ञानी असल्यामुळे या समुदायाला आपल्याकडे आकर्षित करण्यात या संघटनेला बऱ्यापैकी यश आले. तत्कालीन घनदाट जंगलात, डोंगरदरयात राहणारा आदिवासी समुदाय विकासापासून कोसो दूर होता. स्वातंत्र्यप्राप्ती होऊन दोन दशके उलटून गेल्यानंतरही त्यांच्या आयुष्यात फारसा फरक पडला नव्हता, ते अजूनही कंदमुळे खाऊन आणि पारंपारिक पद्धतीनेच जीवनयापन करत होते. रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण अशा मुलभूत सोयीसुविधापासून त्यांना वंचित रहावे लागत होते. आदिवासींच्या अशा स्थितीस सरकार जबाबदार आहे. हे पटवून देण्यात नक्षल संघटना यशस्वी झाली. तसेच त्याकाळी या परिसरात असलेल्या प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडूनही आदिवासींचे शोषण होत होते. हे अधिकारी कर्मचारी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक लुट करत होते. आदिवासींच्या बाजूने लढणारे, बोलणारे कोणीच नसल्याने ही नेतृत्वाची पोकळी नक्षल संघटनेने भरून काढली. त्यांनी आदिवासींना 'आम्ही तुमची सर्व प्रकारच्या शोषणापासून सुटका करू शकतो' असा विश्वास दिला. आदिवासींना त्रास देणाऱ्या, शोषन करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवून वठणीवर आणले. सरकारी कार्यालयात आदिवासींना तासनतास ताटकळत उभे ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या त्यांनी मुसक्या आवळल्या. आदिवासींना जंगलात वेठबिगारासारखे राबवून घेऊन अल्प मजुरी देणाऱ्या वन विभागाच्या अधिकाऱ्यांची चामडी सोलून काढली. आर्थिक शोषण करू पाहणाऱ्या ठेकेदार आणि व्यापाऱ्यांना वठणीवर आणले. त्यामुळे आदिवासी समुदायाचा या संघटनेवरील विश्वास अधिकच वाढत गेला. एकप्रकारे ते आदिवासींचे तारणहार झाले.नक्षल्यांचे समाजकार्य ? दंडकारण्यात प्रारंभीच्या काळात नक्षल संघटनेने काही चांगले समाजपयोगी कार्य केल्याचे काही अभ्यासातून दिसून येते. त्यांचे समर्थक अशा कामाचे दाखले देतात. आदिवासी आणि भूमिहीन शेतकऱ्यांना जमीनदार, वनविभाग आणि श्रीमंताकडून ताब्यात घेतलेली जमिनीचे त्यांनी वितरण केले. या माध्यमातून या भागातील भूमिहीनता कमी झाली. ज्या कुटुंबाकडे पूर्वी जमिनी नव्हत्या ते जमिनीचे मालक बनलेत. त्यामुळे आदिवासींच्या राहणीमानात सुधारणा झाली. 'जल, जंगल,जमीनचा' नारा देत आदिवासींच्या पारंपारिक वन हक्कासाठी लढा दिला. वन विभागाच्या भ्रष्टाचार आणि अत्याचाराविरुध्द आदिवासींना संघटीत केले. वन उत्पादने जसे तेंदू पत्ता, मोह फुल यांच्या विक्रीमध्ये आदिवासींना चांगला दर मिळवून दिला. दैनंदिन मजुरी वाढवून दिली. जिथे शासन प्रशासन पोहोचू शकत नाही अशा भागात जनअदालतच्या माध्यमातून स्थानिक विवाद सोडविले. स्थानिक आदिवासी भाषेत शिक्षणाचा प्रसार केला. आदिवासी संस्कृती, बोलीभाषा, वैभव टिकविण्याकरिता प्रयत्न केलेत. मात्र हे काम सुरुवातीच्या काळात आणि काही विशिष्ट ठिकाणीच झाल्याचे दिसून येते. नंतरच्या काळात हिंसा वाढल्याने आणि नक्षल-पोलीस प्रशासन यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्याने अशी कामे बंद झाली. नक्षलवादी एक दबावगट म्हणून देखील काम करत असल्याचे मत काही अभ्यासक व्यक्त करतात. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे आदिवासी आणि दलितांच्या हितासाठी त्यांनी अनेक प्रगतीशील कायदे आणण्यासाठी परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले जाते. प्रसिद्ध मानवाधिकार कार्यकर्ते के. बालगोपाल यांच्या मते, "वेठबिगारी रद्द करणं आणि किमान वेतनाच्या आसपास मजुरी किंवा मोबदला देणं, हे दोन महत्त्वाचे बदल माओवादी चळवळीच्या दबावामुळेच झाले." मात्र काही अभ्यासक यातील वास्तव वेगळे असल्याचे मान्य करतात. प्रारंभी रॉबिनहूड म्हणून नाव लौकिक मिळवलेली ही संघटना कालांतराने खंडणी बहादर झाल्याचे ते सांगतात. तेंदूपत्ता, बांबू कटाई आणि खाणकाम, रस्ते निर्मिती या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची करवसुली केल्याचे बोलले जाते. यामाध्यमातून झालेली करवसुली ही प्रत्यक्षात शस्त्रे खरेदी, प्रशिक्षण आणि नेत्यांच्या उच्च राहणीमानासाठी वापरल्याचे त्यांचे म्हणणे आहे.अस्ताकडे वाटचालनक्षल चळवळीमागे मार्क्सवादाचे आकर्षण होते. या चळवळीचा नैतिक आधार हा दारिद्र्य, उपासमार, महागाई, आर्थिक शोषण, बेरोजगारी हा होता. चीनमधील माओवाद आणि रशियन साम्यवादी क्रांती ही या चळवळीची वैचारिक बलस्थाने होती. पुढे सोव्हिएत युनियनचं विभाजन आणि पूर्व युरोपातील इतर घडामोडींमुळे मार्क्सवादाचं आकर्षण कमी झालं. विचारसरणी म्हणून माओवादासमोर आव्हानं निर्माण झाली. जागतिकीकरणामुळे सामाजिक-आर्थिक रचनेत बदल झाला. नक्षल प्रभावित राज्यांमध्ये कल्याणकारी योजनांची सुरुवात झाली. उद्योगधंद्यांच्या माध्यमातून तरुणांना रोजगार प्राप्त होऊ लागला. गरीबीचे प्रमाण कमी झाले. हरितक्रांतीने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली, देशाला अन्नधान्याच्या संकटातून बाहेर पडता आलं. शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारले. कालांतरानं नक्षलवादी चळवळीला मिळणारा बौद्धिक पाठिंबा कमी होत गेला. सामाजिक संरचना, लोकांचे प्रश्न आणि संदर्भ बदलू लागलेत. त्यामुळे माओवादी नेत्यांच्या मृत्यूबद्दल समाजाला आस्था वाटेनाशी झाली. १९९० च्या दशकात दलित, स्त्रीवादी आणि साहित्यिक चळवळी माओवाद्यांपासून दूर गेल्या. शहरी मध्यम वर्गातून त्यांना मिळणारा पाठिंबादेखील कमी होत गेला. माओवाद्यांना मिळणारा जनतेचा पाठिंबा जसजसा कमी होत गेला, तसतसा लोकांमधील त्यांच्या सामाजिक-आर्थिक अजेंड्याचं महत्त्व देखील कमी होत गेलं. सरकारनं नक्षल चळवळीला कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानण्यास सुरुवात केली. 'अर्बन नक्षल' ही संकल्पना समाजात लोकप्रिय करण्यात आली. नक्षल्यांच्या बाजूने बोलणाऱ्या व्यक्तींना तुरुंगात डांबण्यात येऊ लागले. सामाजिक संरचना आणि समाजाचे वास्तव प्रश्न समजून घेण्यात कमी पडल्यानेच चळवळ कमकुवत झाल्याचे मत माजी नक्षल समर्थक नेता कोबाड गांधी यांनीही व्यक्त केले आहे. नक्षल चळवळीला अनेक मर्यादा होत्या. मागास, दुर्गम, आदिवासी भाग या चळवळीचे मुख्य कार्यक्षेत्र होते. शहरी भाग आणि त्यांच्या समस्येशी या चळवळीला मेळ साधता आला नाही. वाढत्या शहरीकरणामुळे दुर्गम, जंगली भागापुरती ही चळवळ संकुचित झाली. माओ, लेनिन यांचे विचार हे सर्वव्यापी होते. त्यांच्या विचारांना राष्ट्रवादाची जोड होती. भारतातील नक्षल चळवळीची प्रेरणा ही माओ आणि लेनिन असले तरीही सर्वांना एकजूट करू पाहणारा सर्वव्यापी विचार किंवा अजेंडा मात्र या संघटनेकडे नव्हता. लोकशाहीतील सत्तांतर हे कायदेशीर आणि विधायक माध्यमातून होत असल्याने त्यासाठी रक्तरंजित क्रांतीची भाषा अनेकांना रुचणारी नव्हती.शरणागतीचे कारणे वर्तमानात नक्षलवाद गडचिरोलीत जवळजवळ संपला आहे. आता नक्षलवाद फक्त सीमावर्ती भागात (भामरागड उपविभाग) मर्यादित असल्याचे बोलले जाते. बसवराजू (महासचिव) यांच्या मृत्यूनंतर कमकुवत झालेली चळवळ. रस्ते, शाळा, आरोग्य सुविधा, खाणकाम (मायनिंग) आणि औद्योगिक विस्तारामुळे आदिवासी भागात झालेला विकास ? नक्षलवाद्यांवरील स्थानिक आदिवासींचा कमी झालेला विश्वास. युवक शहरांकडे स्थलांतर करत असल्याने चळवळीत नवीन सदस्यांची बंद झालेली भरती. शरणागतांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'Project Sanjeevani' सारख्या योजना. अनेक शरणागत आता कारखान्यांत काम करतात किंवा व्यवसाय करतात. यामुळे अनेकांना जंगलातील कष्टदायक जीवन सोडून सामान्य आयुष्य जगण्याची संधी मिळाली. चळवळीतील नेतृत्वामध्ये वैचारिक संघर्ष, आणि विश्वासघातामुळे अनेकांचा भ्रमनिरास झाला. उच्च नेते चैनी जीवन जगतात, तर सामान्य सदस्यांना जंगलात त्रास सहन करावा लागतो अशी भावना वाढीस लागली. जंगलातील सतत भटकंती, पुरेशा वैद्यकीय सुविधा नसणे, वयोमान आणि आजार यामुळे अनेक कॅडर थकले. महिलांसह अनेकांनी सामान्य कौटुंबिक जीवन जगण्याची इच्छा व्यक्त केली. वरिष्ठ नेतेच एनकॉउंटरच्या भीतीने शरण आल्याने सामान्य कार्यकर्त्यालाही जीवाची भीती वाटणे साहजिक होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शस्त्र खाली ठेऊन शरणागतीचा मार्ग स्वीकारल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील वर्तमान जिल्ह्यातून नक्षलवाद संपला ही शुभवार्ता म्हणता येईल. कारण या चळवळीने आजवर जिल्ह्यात पोलिसासह शेकडो निरपराध नागरिकांचा बळी घेतला आहे. हे वास्तव आहे. वाटेल त्याला पोलीस खबरी ठरवून क्रूरपणे संपविल्याचे अनेक उदाहरणे आहेत. भामरागड सारख्या अतिदुर्गम भागात वीस वर्षापेक्षा अधिक काळापासून वास्तव्यास असल्याने एकप्रकारे नक्षल्यांची ही क्रूर कृत्ये लेखकाला जवळून बघता आली. संविधानाच्या आणि लोकशाहीच्या कायमच विरोधात असलेल्या या चळवळीचे समर्थन नक्कीच करता येणार नाही. मात्र ही चळवळ संपल्यानंतरही अनेक प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहतात. जिल्ह्यात येऊ घातलेल्या प्रकल्पांना (खाणी) विरोध होऊ नये म्हणून नक्षल्यांना संपविल्याचा एक मत प्रवाह जिल्ह्यात आहे. कारण काही वर्षापूर्वी एटापल्ली तालुक्यात सुरजागड येथे सुरु झालेला लोह खनिज प्रकल्प आणि त्या अनुषंगाने बेसुमार झालेली जंगलतोड लोकांनी अनुभवली आहे. नक्षल्यांचा या भागातील खाणीस विरोध होता. या विरोधामुळे उत्खननास कंपन्या तयार होत नव्हत्या. या विरोधामुळेच शेकडो हेक्टर जंगल वाचले होते. सुरजागड प्रमाणेच जिल्ह्यातील अनेक दुर्गम भागात विपुल प्रमाणात खनिजांचे साठे आहेत. आता नक्षलच संपले म्हटल्यावर अनेक प्रकल्पाचे मार्ग मोकळे झाले आहे. बंदुकीच्या धाकावर का होईना मात्र नक्षल्यांमुळे ही वनसंपदा शाबूत होती. असे अनेकांना वाटते. या भागातील आदिवासी निसर्गपूजक आहेत. निसर्गच त्यांचा देव आणि संस्कृती आहे. कित्येक पिढ्यांपासून ते या जंगलात वास्तव्यास आहे. हे जंगल आता इतिहासजमा होण्याची भीती त्यांना सतावत आहे. रोजगारासाठी प्रकल्प आवश्यक आहे आणि प्रकल्पासाठी जंगल तोडून उत्खणन आवश्यक आहे. हे मान्य केले तरीही वर्तमानात सुरु असलेल्या प्रकल्पामुळे किती स्थानिकांना रोजगार मिळाला हा संशोधनाचा विषय आहे. नक्षलवाद ही केवळ एक चळवळ नव्हती तर तो एक विचार होता. असेही अनेकांना वाटते. अन्याय, अत्याचार, शोषणाविरुद्धची ती एक प्रतिक्रिया होती. त्यामुळे जोवर आर्थिक विषमता, बेरोजगारी आणि शोषण राहील तोवर हा विचार येथील नागरिकांमध्ये जिवंतच राहील. विकासास अडसर ठरू पाहणाऱ्या नक्षल चळवळीला संपवून विकासाची वाट आम्ही सुकर केली असे शासन म्हणत असले तरीही हा विकास केवळ बोटावर मोजण्या इतपत धनाड्यांचा नसावा अशी माफक अपेक्षा येथील सर्वसामान्यांची असणार आहे. जिल्ह्यातील बंदुकीचा आवाज थांबला आहे, मात्र आता विकासाचा शंखनादही तितक्याच जोराने होणे गरजेचे आहे. अन्यथा हा विचार असाच तेवत राहील, यात शंका नाही.


**डॉ. संतोष संभाजी डाखरे**
(राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली)

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २३ एप्रिल २०२६


# वाचनसंस्कृतीचा दीपस्तंभ : 'जागतिक पुस्तक दिन

**२३** एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पुस्तक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ पुस्तकांचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून तो ज्ञान, विचार, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या जतनाचा व प्रसाराचा उत्सव आहे. मानवी सभ्यतेच्या इतिहासात पुस्तकांनी जे योगदान दिले आहे, ते अनमोल आहे. शब्दांच्या माध्यमातून माणसाने आपल्या अनुभवांना, विचारांना, ज्ञानाला आणि संस्कृतीला आकार दिला आणि ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे पुस्तक हे केवळ अक्षरांचा संच नसून ते मानवी उत्क्रांतीचे आणि सामाजिक प्रगतीचे सशक्त साधन आहे. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला या महत्त्वाची जाणीव करून देणारा आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देणारा एक प्रेरणादायी दिवस आहे.मानवाच्या आरंभीच्या काळात ज्ञानाची देवाणघेवाण तोंडी परंपरेतून होत असे. कथा, लोकपरंपरा, धार्मिक विधी आणि जीवनातील अनुभव यांद्वारे ज्ञान पिढ्यान्‌पिढ्या पुढे जात होते. परंतु लिपीचा शोध लागल्यानंतर ज्ञानाचे लिखित स्वरूपात जतन होऊ लागले आणि तेच पुढे पुस्तकांच्या स्वरूपात विकसित झाले. भारतीय संस्कृतीमध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, संत साहित्य आणि विविध तत्त्वज्ञानपर ग्रंथांनी ज्ञानपरंपरेचा भक्कम पाया घातला. या ग्रंथांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक विचार नाहीत, तर मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये, सामाजिक संरचना आणि जीवनपद्धती यांचा सखोल अभ्यास आढळतो. त्यामुळे पुस्तक हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक ठरते.वाचन ही एक सवय नसून ती एक संस्कारप्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना मिळते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि विवेकबुद्धी विकसित होते. एखादे पुस्तक वाचताना वाचक त्या लेखकाच्या अनुभवविश्वात प्रवेश करतो आणि विविध भावविश्वांचा अनुभव घेतो. त्यामुळे वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती आत्मविकासाची एक सर्जनशील यात्रा आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि समंजस बनते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा विचारशील व्यक्तींची आवश्यकता असते.आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचा स्फोट झाला आहे. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे यांमुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे. परंतु या माहितीच्या महासागरात सखोल ज्ञान हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती ही तात्पुरती आणि तुकड्यांमध्ये मिळणारी असते, तर ज्ञान हे सुसंगत, सखोल आणि टिकाऊ असते. पुस्तक वाचनामुळेच हे सखोल ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल माध्यमे ही पूरक साधने असू शकतात, परंतु त्यांची जागा पुस्तक घेऊ शकत नाही.विद्यार्थी जीवनात वाचनाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित ठेवणे योग्य नाही. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, चरित्रे, विज्ञान, इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील पुस्तके वाचल्यास विद्यार्थ्यांची ज्ञानाची व्याप्ती वाढते. वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपदा वाढते आणि विचार मांडण्याची क्षमता सुधारते. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर वाचनसंस्कृती रुजवणे अत्यंत गरजेचे आहे.समाजाच्या दृष्टीने पाहिले, तर वाचनसंस्कृती असलेला समाज अधिक प्रगत आणि जागरूक असतो. वाचनामुळे नागरिकांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांविषयी जाणीव निर्माण होते. पुस्तकांच्या माध्यमातूनच अनेक सामाजिक चळवळींना बळ मिळाले आहे. समाजसुधारकांनी आपल्या लेखनातून समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे वाचनसंस्कृती ही लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत आवश्यक आहे.मराठी साहित्य परंपरा अत्यंत समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. त्यांच्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला गेला आणि परिवर्तनाची प्रेरणा दिली गेली. साहित्य हे समाजाचे आरसे आहे, असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे.आजच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, वेळेअभावी वाचनाकडे दुर्लक्ष, पुस्तकांच्या वाढत्या किंमती, तसेच ग्रंथालयांची अपुरी संख्या ही काही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः लहान मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत चालल्याचे दिसते. त्यामुळे बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुस्तकांची ओळख करून द्यावी आणि त्यांच्यासोबत वाचनाचा आनंद घ्यावा.ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची केंद्रे आहेत. ग्रामीण भागात ग्रंथालयांची संख्या वाढवणे आणि त्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी वाचनालये उभारून वाचनसंस्कृतीला चालना देता येऊ शकते. तसेच, पुस्तक प्रदर्शन, वाचन स्पर्धा, लेखक-वाचक संवाद, कथाकथन कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे वाचनाची आवड वाढवता येते.'जागतिक पुस्तक दिन' साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे वाचनसंस्कृतीला चालना देणे आणि लेखकांच्या योगदानाचा गौरव करणे हा आहे. या दिवशी विविध ठिकाणी पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक कार्यक्रम, चर्चासत्रे आणि व्याख्याने आयोजित केली जातात. यामुळे लोकांमध्ये पुस्तकांविषयी जागरूकता निर्माण होते.तंत्रज्ञानाच्या युगात ई-पुस्तके आणि ऑडिओ पुस्तके यांचा वापर वाढत आहे. ही साधने वाचनासाठी उपयुक्त ठरत असली, तरी पारंपरिक पुस्तकांचे महत्त्व अजूनही कायम आहे. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाही पारंपरिक वाचनसंस्कृती जपणे आवश्यक आहे.वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासन यांनी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. 'दर महिन्याला एक पुस्तक' अशी संकल्पना राबवता येईल.शेवटी असे म्हणता येईल की, पुस्तक हे मानवाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. ज्ञान, संस्कार आणि विचार यांचे संगम म्हणजे पुस्तक. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला वाचनाची प्रेरणा देणारा दिवस आहे. आजच्या युगात सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासून ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीत आपला वाटा उचलावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com


# तिसगावातील काळे वस्तीजवळ डीपी (Transformer) जळाल्यामुळे शेतकरी त्रस्त: पिके सुकण्याच्या मार्गावर, महावितरणचे दुर्लक्ष



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील उपकेंद्र गल्ले बोरगाव महावितरणाच्या (MSEDCL) ढिसाळ कारभारामुळे शेतीचे डी.पी. (ट्रान्सफॉर्मर) वारंवार जळण्याचे प्रमाण वाढले आहे,ज्यामुळे तिसगाव शिवारातील व काळे वस्ती जवळील गणेश काळे नावाने डि पी 100 के व्ही ए, डी टी सी असलेली डि पी दिनांक 30 मार्च 2026 रोजी जळली होती त्यानंतर शेतक-यांनी वारंवार तक्रारी केल्या परंतु त्या तक्रारीचे निवारण केले जात नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. ऐन पिकांच्या वाढीच्या, दाणे येण्याच्या काळात वीज पुरवठा खंडित झाल्याने लाखो रुपयांची पिके संकटात सापडली आहेत. शेतकरी व ग्रामस्थांनी डीपी बदलण्यासाठी तक्रारी करूनही महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आहे. अनेक ठिकाणी डीपी जळाल्यानंतर नवीन डीपी मिळण्यास महिण्याचा कालावधी लागत आहे.डीपी जळाल्यामुळे पाणी न मिळाल्याने निर्यातक्षम मिर्ची ,ऊस, बाजरी, आणि भेंडी ही पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत.वस्तीवरील शेतक-यांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. तसेच गायी,बैल, म्हैस या पाळीव प्राण्यांना पिण्यासाठी सुद्धा पाणी मिळत नाही त्यामुळे चंद्रकांत चव्हाण, साहेबराव व्यवहारे, निलेश काळे, आकाश चव्हाण, संदीप चव्हाण, रवी काळे, अमोल काळे, अमोल काळे, गणेश काळे, संतोष व्यवहारे, रुपेश काळे, सुभाष काळे, कैलास अव्हाड, दिनेश अधाने, सचिन अधाने, बंडू अधाने, पंडित राठोड,पिंटू अधाने या शेतक-यांनी संताप व्यक्त केला आहे.